# वार्तापत्र

कात्रक रोडवरील मोनोरेलच्या कामादरम्यान वाहन चालक व पादचाऱ्यांची सुरक्षितता, त्यांना होणारे अडथळे व धोका टाळण्यास्तव खालील प्रमाणे वाहतूकीवर २४ तास निर्बंध घ ालण्यात येत आहेत.

१. कात्रक रोड उत्तर वाहीनीवर (अलबेला हनुमान चौकाकडून विठ्ठल रुक्मीणी चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर) विठ्ठल रुक्मीणी चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना 'प्रवेश बंदी' राहील.

२. कात्रक रोड दक्षिण वाहीनीवर (विठ्ठल रुक्मीणी चौकाकडून अलबेला हनुमान चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर) अलबेला हनुमान चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना 'प्रवेश बंदी' राहील.

३. जी.डी आंबेकर मार्ग, टिळक रोडवरुन अलबेला हनुमान चौकतून कात्रक रोड मार्गे उत्तर वाहीनीने पुढे विठ्ठल रुक्मीणी चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही बाळाराम खेडेकर मार्गाने वळविण्यात येईल.

४. कात्रक रोडने अलबेला हनुमान चौकात जाणारी दक्षिण वाहिनीवरील वाहतूक ही. डी. एस बॅरेटो सर्कल येथून बाळाराम खेडेकर मार्गाने वळविण्यात येईल.

५. सदर कामादरम्यान बाळाराम खेडेकर मार्गावर सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास प्रतिबंध **(नो पार्कींग)** राहील.

वाहन चालकांच्या मार्गदर्शनासाठी वाहतूक पोलीसांकडून वर नमूद ठिकाणी सूचना फलक लावण्यात येतील. जनतेला मदत करण्यासाठी वाहतूक पोलीसांची नेमणूक देखील करण्यात येणार आहे, जेणेकरून वाहन चालक व पादचा—यांना कमीतकमी गैरसोय होईल व रहदारी सुरळीत चालू राहील.

sd/-
( ब्रिजेश सिंग )
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक,
मुंबई